## संपादकीय

# जीवघेणा हव्यास

समाजमाध्यमांवरील प्रसिद्धीचा हव्यास आता मृत्यूच्या दाढेपर्यंत पोहोचायला लागला आहे. रिल्सशी संबंधित मन अस्वस्थ करणारे वृत्त प्रसिद्ध होत नाही असा दिवस क्वचितच उगवावा अशी सद्यस्थिती आहे. तीनशे फूट खोल पडून मृत्यू पावलेल्या अन्वी कामदारच्या घटनेची वेदना कमी होत नाही तोच मध्यप्रदेश मुरेना येथे अकरा वर्षांच्या मुलाचा गळफास बसून मृत्यू झाला. खेळतांना तो आणि त्याचे मित्र रिल्स बनवण्याचा प्रयत्न करत होते असे प्रसिद्ध झालेल्या वृतांत म्हटले आहे. कार चालवतानाचा रील बनवण्याच्या नादात छत्रपती संभाजीनगरमध्ये कार दरीत कोसळून तरुणीचा मृत्यू झाला. अशा घटना घडण्याचे प्रमाण वाढतच आहे. समाजमाध्यमांवरील प्रसिद्धीचे गारुड इतके खोलवर भिनले आहे की युवा विचारशक्ती गमावून बसत असावेत का? अन्वी सीए झालेली होती. वयाची एकवीशी ओलांडलेल्या युवांकडून समाजाला किमान समजूतदारपणाची अपेक्षा असणे चूक मानले जाऊ शकेल का? तथापि अलीकडच्या काही घटनांमधील युवांनी वयाची किमान विशी ओलांडलेली होती. फारसे कर्तृत्व न दाखवता समाजमाध्यमांवर प्रसिद्धी मिळते. प्रभावकांना (इन्फ्लुएन्सर्स) ना आर्थिक कमाई होते, त्याचाही मोह होण्याचे ते वय असते हे खरे. तथापि सगळ्याच प्रभावकांना पैसे मिळतात हा भ्रम झालेला आढळतो. समाजमाध्यमांवरील कमाईचे गणित समजावून घ्यावे असे शिकलेल्या युवांनाही वाटू नये. त्यांना लाखो मुले फॉलो करतात ती किती प्रभावक त्यांची जबाबदारी मानतात? किंबहुना अतरंगी गोष्टी करणे, अतिरेकी धाडस करणे, जीव धोक्यात घालणे हा प्रसिद्धीचा हव्यासच नाही का? काय करतो, का करतो, कुठे करतो, जे करतो ते जीव धोक्यात घालू शकतो असे प्रश्न कोणालाही का पडत नसावेत? थोडासा दोष फॉलोअर्सचा पण मानला जाऊ शकेल का? ज्ञानात भर टाकणारा, भारतीय संस्कृतीचा परिचय करून देणारा मजकूर टाकणारे प्रभावकही खूप आढळतात. जाणीवपूर्वक त्यांना फॉलो करावे असे किती लोकांना वाटत असावे? अश्लील,अतिरेकी, मूर्खपणा सिद्ध करणारा मजकूर टाकणाऱ्यांच्या तुलनेत आशयघन मजकूर टाकणाऱ्यांचे फॉलोअर्स कमी का आढळत असावेत? काहीतरी विचित्र केले तरच बघ्यांना आवडते आणि ते फॉलो करतात असा अनेकांचा भ्रम त्यामुळेही होत असावा का? असा हा सगळा गुंता आहे. जो सोडवण्याचा प्रयत्न करण्यासाठी जाणते, समजूतदार युवा आणि जाणते प्रभावक, पालक आणि सरकार यांनी एकत्र येण्याची गरज आहे.

# महिलांनी फुलशेतीतून रोजगार निर्मितीसाठी पुढे यावे: सौ. विखे

**राहाता (प्रतिनिधी)** – महिलांच्या सक्षमीकरणासाठी जनसेवा फाऊंडेशनच्या योजना आहेत. यामध्ये महिलांनी सक्रिय सहभाग घ्यावा टाकाऊपासून टिकाऊ तंत्रज्ञानाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. सुकलेल्या फुलांपासून बनवलेल्या वस्तूंना मोठी बाजारपेठ सध्या उपलब्ध आहे. प्रशिक्षणातून उत्पादित वस्तूना बाजारपेठ उपलब्ध करून दिली जाईल. यासाठी महिलांनी पुढाकार घ्यावा, असे प्रतिपादन शालिनीताई विखे पाटील यांनी केले.

बाभळेश्वर येथे सी.एस. आय. आर आणि राष्ट्रीय वनस्पती अनु संधान संस्था, लखनौ फ्लोरिकल्चर मिशन, अंतर्गत जनसेवा फाउंडेशन लोणी आणि कृषी विज्ञान केंद्र बाभळेश्वर यांच्या संयुक्त विद्यमाने सुकलेल्या फुलांपासून विविध कलाकृती आणि ग्रिटींग कार्ड आणि ज्वेलरी मेकिंग या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी सौ. विखे बोलत होत्या. याप्रसंगी फ्लोरिकल्चर मिशनचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ.विजय वाघ, डॉ.श्वेता सिंग, प्रवरा भाजी पाला सोसायटीच्या अध्यक्षा गीता थेटे, भाजपा महिला




तालुका अध्यक्षा शोभा घोरपडे, उपाध्यक्षा सुवर्णा मोकाशी, बबलू म्हस्के, अमृत मोकाशी, शंकर बेंद्रे, प्रकल्प अधिकारी रुपाली लोंढे, प्रमुख शास्त्रज्ञ शैलेश देशमुख यांच्यासह सर्व बचत गटातील महिला, शेतकरी व विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी सौ. विखे म्हणाल्या, आज लाईट वेट ज्वेलरीला मोठी मागणी आहे. फुलांपासून आकर्षक वस्तूंबरोबरच ज्वेलरी तयार करण्याचे हे प्रशिक्षण महिलांना महत्त्वपूर्ण ठरणार असून याविषयी सविस्तर प्रशिक्षणासाठीही महिलांना जनसेवा फाउंडेशन मार्फत मदत केली जाईल. महिलांनो तुम्ही उत्पादन घ्या प्रशिक्षण आणि बाजारपेठेसाठी आम्ही आपल्या सोबत आहोत असा आत्मविश्वास महिलांना सौ. विखे यांनी दिला.

डॉ. वाघ यांनी फ्लोरिकल्चर मिशनविषयी माहिती देताना २३ राज्यांत हे काम उत्कृष्टपणे सुरू आहे. फूल शेतीला मोठी संधी आहे यापासून महिलांनी रोजगार निर्मिती सुरू करावी आज सुकलेल्या फुलांपासून आकर्षक वेगवेगळ्या वस्तूं बरोबरच आकर्षक अशा ज्वेलरी तयार केली जाते प्रशिक्षणाबरोबरच बाजारपेठही उपलब्ध करण्यासाठी संस्थेच्या माध्यमातून प्रयत्न सुरू आहेत. याचा लाभ महिलांनी घेऊन पुढे जाण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. जनसेवा फाउंडेशनच्या माध्यमातून फूल शेतीला या भागांमध्ये मोठी चालना दिली जात आहे. यासाठी महिलांनी पुढाकार घ्यावा असेही त्यांनी सांगितले. प्रशिक्षणामध्ये प्रवरा शैक्षणिक संकुलातील विद्यार्थ्यांसह आणि परिसरातील महिलांनी मोठा सहभाग घेतला. सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन केंद्राच्या विस्तार विभाग प्रमुख प्रियंका खर्डे यांनी केले.

# पिंपरी निर्मळ येथे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची नोंदणी उत्साहात सुरू

**पिंपरी निर्मळ (वार्ताहर)**– राज्यातील महायुती सरकारने महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी सुरू केलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेला पिंपरी निर्मळ येथे मोठा प्रतिसाद मिळत असून अंगणवाडी सेविका व संबंधित विभागातील कर्मचारी यांच्या योगदानामुळे मोठ्या प्रमाणात नोंदणी होत आहे.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यांमध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू झालेली आहे. महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यामध्ये या योजनेने वेग घेतला आहे. योजनेअंतर्गत पात्र महिलांना महिन्यासाठी दीड हजार रुपये शासनाकडून मदत मिळणार आहे. यासाठी शासकीय पोर्टलवर योग्य त्या कागदपत्रांसह नोंदणी करणे आवश्यक आहे. ही नोंदणी अंगणवाडी सेविका यांच्या माध्यमातून तसेच वैयक्तिक करता येणार आहे. पिंपरी निर्मळ येथे पात्र महिलांची संख्या मोठी असल्याने नोंदणीसाठी शालिनीताई विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अंगणवाडी सेविका सरसावल्या आहेत. लाभार्थी महिलांचे कागदपत्र नारीशक्ती दूत या ॲपवर नोंदणीसाठी पूर्णवेळ कार्यरत आहेत. यात अंगणवाडी पर्यवेक्षीका संध्या गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली जयश्री निर्मळ, सिंधू निर्मळ, मोहिनी डोखे, रोहिणी निर्मळ, मुक्ताबाई घोरपडे, सुवर्णा कांबळे, सुमन पवार, तृप्ती निर्मळ आदी अंगणवाडी सेविका कार्यरत आहेत. अंगणवाडी सेविकांच्या या पुढाकारामुळे येथील मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून सर्वच पात्र महिलांना योजनेचा लाभ मिळणार आहे.

# शिंदे यांचा महाराष्ट्र कृषीभूषण पुरस्काराने मुंबईत गौरव

**संगमनेर (प्रतिनिधी)** – तालुक्यातील रहिमपूर येथील प्रगतिशील शेतकरी गणपत बाळासाहेब शिंदे यांचा नुकताच समृद्धी पब्लिकेशन व सम्यक सामाजिक संस्था मुंबई यांच्यावतीने आयोजित राष्ट्रीय एकात्मता गौरव संमेलनात महाराष्ट्र कृषीभूषण पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.



रहिमपूर या छोट्याशा गावात शेतकऱ्यांच्या जीवनात या अवलिया व्यक्तीने आपल्या जयश्री ॲग्रो सीडलिंग्ज या रोपवाटिकेच्या माध्यमातून समृद्धी आणली. नाविन्याचा ध्यास, प्रचंड कष्ट, सामाजिक बांधिलकी यांचा मिलाफ म्हणजे गणपत शिंदे आहे. सर्वसामान्य शेतकऱ्यांना रोपवाटिकेच्या माध्यमातून नुसतीच रोपे न पुरवता पीक व्यवस्थापन तथा विक्री व्यवस्थेपर्यंतचे नियोजन ते करतात, म्हणूनच त्यांची शेतकऱ्यांच्या जीवनात खरी समृद्धी आणणारा शेतकरी मित्र अशी ओळख निर्माण झाली आहे. त्यांच्या याच समाजकार्याची व उत्तम व्यवसाय व्यपस्थापनाची दखल घेत या संस्थेने त्यांना महाराष्ट्र कृषीभूषण पुरस्कार देत त्यांचा गौरव केला आहे. गणपत शिंदे हे रहिमपूर विविध कार्यकारी सेवा सोसायटीच्या अध्यक्षपदाची तसेच प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या विश्वस्त पदाची धुरा देखील मोठ्या जबाबदारीने सांभाळत आहेत. त्यांच्या या गौरवाबद्दल महसूल, पशुसंवर्धन व दुग्धविकास मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनी विखे पाटील, माजी खासदार डॉ.सुजय विखे पाटील यांसह ग्रामस्थ व शेतकऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

# चाईल्ड करिअरमध्ये गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी



**सलाबतपूर (वार्ताहर)**– नेवसा तालुक्यातील सलाबतपूर येथील चाईल्ड करिअर इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनियर कॉलेजमध्ये गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. गुरौर्णिमेनिमित्त पहिली ते बारावीच्या विद्यार्थ्यांनी गीते व कविता सादर केल्या. विद्यार्थ्यानी स्वत: तयार केलेले पुष्पगुच्छ व पेन देऊन सर्व शिक्षकाप्रती असलेला आपला आदर व्यक्त केला. शिक्षकांनी केलेल्या सत्कारानंतर मुख्याध्यापक रविंद्र गावडे यांनी गुरुपौर्णिमेचे महत्व विद्यार्थ्यांना सांगितले व त्यानंतर शिक्षक संतोष निकम, संजय गरूते व मीनाक्षी तांबे यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी छाया निकम, उमा कुऱ्हाडे, रेणुका गोरे, सोनाली सय्यद, छाया लालझारे, मनीषा परदेशी, सुप्रिया लिंब, निलेश निधणे, शारुख सय्यद, संतोष निकम, संजय गरूटे, कैलास तांबे, अशोक मगर, विजय साळुंके यांनी परिश्रम घेतले.

# कृषिकन्यांच्यावतीने आयोजित महिला परिसंवादास प्रतिसाद

**वडळा बहिरोबा (वार्ताहर)** – नेवासा तालुक्यातील वडाळा बहीरोबा येथे सोनई कृषी महाविद्यालयाच्या कृषिकन्यांच्यावतीने महिला परिसंवाद नुकताच पार पडला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. हरी मोरे होते.

तालुका कृषी अधिकारी धनंजय हिरवे, सरपंच ललीत मोटे, उपसरपंच मंगलताई पटेकर, माजी सरपंच बाबासाहेब मोटे, माजी उपसपंच सचिन मोटे, प्रगतिशील शेतकरी सुजित मोटे, शिक्षिका रजनी मोटे, महिला बचत गटाचे प्रभाग समन्वयक नितीन पंडित, कृषी व्यवस्थापक निखिल नागे, समुदाय संसाधन सल्लागार निता नागे, सदस्य संजीवनी जाधव, कृषिसखी जयश्री नागे तसेच कार्यक्रम समन्वयक डॉ.अतुल दरंदले, प्रा. जयसिंग वाघमारे, प्रा. राहुल गोंधळी, प्रा. आर. टी. दिघे, डॉ. निखिल कदम, डॉ. प्रवीण झीने, डॉ. अविनाश काकडे, प्रा.दिशा चव्हाण आदी उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. हरी मोरे यांनी महाविद्यालयामध्ये चालत असलेल्या विविध प्रकल्पांची माहिती दिली. प्रा. डॉ .निखिल कदम यांनी महिलांसाठी असणाऱ्या विविध शासकीय योजना ऑईल मिल, दाळ मिल बाबत मार्गदर्शन केले. प्रा. दिशा चव्हाण यांनी लघुउद्योग लाकडी घाना, केळी चिप्स, पापड निर्मिती यावर सविस्तर माहिती दिली. त्यानंतर डॉ.प्रवीण झिने यांनी दुधाचे आहारातील महत्त्व व सोयाबीनपासून दूध व टोफो निर्मिती तंत्रज्ञान, पारंपरिक पनीर निर्मिती व सोया पनीर याविषयी मार्गदर्शन केले.

डॉ.अविनाश काकडे यांनी प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया योजनेबद्दल माहिती दिली, तसेच ड्रोन दीदी या योजनेवर मार्गदर्शन केले तसेच योजनेसाठी पात्रता आणि फॉर्म भरण्याचे मार्गदर्शन केले. कृषी अधिकारी धनंजय हिरवे यांनी कृषीविषयक विविध योजनांचे मार्गदर्शन केले. प्रा. जयसिंग वाघमारे यांनी जमिनीतील अन्न द्रव्य,माती परीक्षणाचे महत्त्व या विषयावर मार्गदर्शन केले. कृषी व्यवस्थापक निखिल नागे यांनी परसबागेचे महत्त्व यावर योग्य प्रकारे मार्गदर्शन केले.

कार्यक्रम पार पाडण्यासाठी कृषीकन्या प्रगती ढमढेरे, स्नेहा कांबळे, भारती लंघे, वैष्णवी आगळे, प्रणाली माळी यांनी परिश्रम घेतले.

यावेळी शिवाजी मोटे, सागर मोटे, शरद मोटे, दिगंबर मोटे, शुभम मोटे, अभिषेक मोटे, गोरख निमसे, बाळासाहेब मोटे आदी ग्रामस्थ व लीलाबाई मोटे, राजश्री मोटे, विजया मोटे, पद्मा मोटे, योगिनी मोटे, उज्ज्वला मोटे, उषा मोटे, कमल मोटे, अनुष्का मोटे, अंजली मोटे उपस्थित होत्या.

# नायक गोर्डे यांच्या कुटुंबियांचे गणेशच्या पदधिकाऱ्यांकडून सांत्वन



**राहाता (तालुका प्रतिनिधी)**– राहता तालुक्यातील केलवड येथील वीर जवान नाईक स्वर्गीय गणेश दगडू गोर्डे यांच्या कुटुंबियांचे श्रीगणेश सहकारी साखर कारखान्याच्या पदाधिकाऱ्यांनी सांत्वन करत नायक गणेश गोर्डे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.

शुक्रवारी सेवेत असताना म्युकर मायकोसिस या आजारामुळे नायक गणेश गोर्डे यांचे अकाली निधन झाले. काल श्रीगणेश सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष सुधिर लहारे, उपाध्यक्ष विजय दंडवते, डॉ. एकनाथ गोंदकर, संचालक नानासाहेब नळे, अरविंद फोपसे, विष्णूपंत शेळके, बाळासाहेब चोळके, संपत हिंगे, पोलीस पाटील सुरेश गमे यांनी गोर्डे कुटुंबियांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.

# नेवासा बुद्रुक, भालगाव, गोधेगाव मार्गे प्रवरासगम बससाठी पाठपुरावा

**देवगड फाटा (वार्ताहर)**– नेवासा ते नेवासा बुद्रुक, भालगाव, गोधेगाव, वाशिम, टोका मार्गे प्रवरासंगम बस सेवा सुरू करण्याची मागणी आमदार शंकरराव गडाख यांनी राज्य परिवहन महामंडळाच्या विभाग नियंत्रकांकडे केली असून त्यासाठी त्यांनी पाठपुरावा सुरू ठेवला असल्याने ही बस लवकरच सुरु होणार आहे.

आमदार शंकरराव गडाख मित्रमंडळाच्या कार्यकर्त्यांनी आमदार गडाख यांच्याकडे नेवासा ते प्रवरासंगम दरम्यान बस सेवा सुरू करण्याची मागणी केली होती. नेवासा तसेच प्रवरासंगम ही दोन ठिकाणे सोडली तर या मार्गावरील भालगाव, गोधेगाव, वाशिम, टोका या गावांना जोडण्यासाठी बससेवा नाही. या गावांत माध्यमिक शिक्षणाची सुविधा नसल्याने सुमारे ६० ते ७० विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी नेवासा तसेच प्रवरासंगम येथे हालअपेष्टा सहन करत जावे लागते. आमदार गडाख यांनी विभाग नियंत्रकांना पत्र लिहून या मार्गावर बस सेवा तातडीने सुरू करण्याची सूचना केली आहे. बस सेवा सुरू होण्यासाठी अखंडित पाठपुरावा सुरू ठेवल्याने लवकरच या मार्गावर बस सेवा सुरू होऊन ग्रामस्थांसह विद्यार्थ्यांची गैरसोय दूर होणार असल्याची आशा कार्यकर्त्यांनी व्यक्त केली आहे.

# गुरुद्वारा श्री गुरुसिंग सभा श्रीरामपूर ते डोमेगाव पायी यात्रा



**श्रीरामपूर (प्रतिनिधी)**– येथील गुरुद्वारा श्री गुरुसिंग सभा श्रीरामपूर ते तालुक्यातील डोमेगाव येथील बिरदबाबा गुरुद्वारा पायी यात्रा उत्साहात संपन्न झाली.

पायी यात्रेचे ४२ वे वर्ष होते. दरवर्षीप्रमाणेच यावर्षी भाविकांनी पायी यात्रेत मोठ्या संख्येने सहभाग घेतला. रविवार दि.२१ जुलै रोजी पहाटे ४.३० वाजता पायी यात्रेला सुरुवात झाली. दुपारी डोमेगाव येथील गुरुद्वारामध्ये पोहोचले. रस्त्यात ठिकठिकाणी यात्रेचे नागरिकांकडून स्वागत करण्यात आले. डोमेगाव येथे ग्यानी अनोखसिंग मस्कीन व भाई मनप्रितसिंग यांचे कीर्तन झाले. सकाळी ११.३० ते दुपारी २.३० या वेळेत अरदास, दिवान की समाप्ती आदी कार्यक्रम झाले. शेवटी भंडारा महाप्रसाद (लंगर) वाटण्यात आला. या कार्यक्रमास यात्रेतील भाविकांसह डोमेगाव व परिसरातील नागरिकांनी लाभ घेतला. यात्रा यशस्वीतेसाठी अनगड धुप्पड, श्री. सेठी, अनमोल भटियाणी, सिमरन बत्रा, किशोर छतवाणी, जतिन बजाज, मच्छी ठकराल, विकी चुग, देवेन ठकराल आदी सहभागी झाले होते.

# नगरपालिका शाळेत शैक्षणिक साहित्याचे वाटप

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)**– येथील नगरपालिका शाळा क्र. २ सुभाष कॉलनी शाळेत नगरपालिकेच्या सेवानिवृत्त शिक्षकांकडून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.



यावेळी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा अंजूम पापा सय्यद होत्या. याप्रसंगी नगरपालिका सेवानिवृत्त शिक्षक संघ्राचे अध्यक्ष प्रकाश माने, महाराष्ट्र राज्य नगरपालिका, महानगरपालिका शिक्षक संघ्राचे राज्य सल्लागार नवनाथ अकोलकर, ताराचंद पगारे, अजय शिंदे, शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा वर्षाताई बलसाने, सदस्या संगीताताई चांदणे, नयनाकौर टाक आदी उपस्थित होते. यावेळी दानशूर सेवानिवृत्त शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी नवनाथ अकोलकर, प्रकाश माने, ताराचंद पगारे, अजय शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक मुख्याध्यापिका श्रीमती सुरेखा डांगे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दीपाली शेळके, सचिन शिंदे यांनी विशेष प्रयत्न घेतले. सूत्रसंचालन सचिन शिंदे यांनी केले. तर आभार दिपाली शेळके यांनी मानले.

# शेतकरी संघटनेच्यावतीने २५ जुलै रोजी जिल्हा दुग्धविकास अधिकाऱ्यांचा घेराव

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)**– राज्य शासनाने दूध दरासंदर्भात ५ जुलै रोजी शासन निर्णय करून ३.५ फॅट व ८.५ एसएनएफच्या दुधास १ जुलैपासून ३० रुपये प्रति लिटर दर जाहीर केला. परंतु अनेक दूध संघांनी शासनाने आदेशीत केलेला दूध दर देण्यास असमर्थता दर्शविली. त्यामुळे शेतकरी संघटनेच्यावतीने जिल्हा दुग्धविकास अधिकारी यांना २५ जुलै रोजी सकाळी ११ वाजता घेरावो घालण्यात येणार आहे. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर गोंडेगाव येथील जनजागृती सभेत शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अनिल औताडे बोलत होते.



औताडे म्हणाले, लोकशाही स्विकारलेल्या देशात व राज्यात निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधी व प्रशासकीय अधिकाऱ्यांकडूनच कायदेशीर मार्गाचा अवलंब होत नाही, ही बाब गैर आहे. राज्य शासनाने काढलेल्या अध्यादेशाची अंमलबजावणी अहमदनगर जिल्हा दुग्धविकास अधिकारी यांच्याकडून प्रभावीपणे होत नाही. शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याचे अधिकार जिल्हा दुग्धविकास अधिकारी यांना असूनही ते संबंधित संघांवर अथवा दूध संकलन केंद्रांवर कारवाई का करत नाही असाही सवाल निर्माण होत आहे. जानेवारी ते मार्च या दोन महिन्यांतील प्रति लिटर पाच रुपये राज्य शासनाचे अनुदानही शेतकऱ्यांना मिळालेले नाही. या भ्रष्ट व बेकायदेशीर व्यवस्थेचा शेतकरी बळी ठरत आहे. त्यामुळे या गंभीर बाबींचा जाब विचारण्यासाठी शेतकरी संघटना व दूध उत्पादक शेतकरी संबंधित अधिकाऱ्यांना घेराव घालून ठिय्या आंदोलन करणार आहे. तरी या आंदोलनास जास्तीत जास्त संख्येने दुध उत्पादक शेतकऱ्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन शेतकरी औताडे यांनी केले आहे. यावेळी शेतकरी संघटनेचे ज्येष्ठ मार्गदर्शक सुदाम औताडे, शेतकरी संघटनेचे विलासराव कदम, संतोष हरगुडे, भाऊलाल फोपसे, अशोक थोरात, विजय भवर, धोंडीराम म्हैस, राजेंद्र कापसे, यशवंत फोपसे, रमेश फोपसे आदींसह दूध उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

# ५ नंबर साठवण तलाव कोपरगावच्या विकासात मैलाचा दगड ठरणार : गंगुले

**कोपरगाव (प्रतिनिधी)**– आ. आशुतोष काळे यांनी कोपरगाव शहरातील नागरिकांना दाखविलेले स्वप्न सत्यात उतरणार असून ५ नंबर साठवण तलाव कोपरगावच्या विकासात मैलाचा दगड ठरणार असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष सुनील गंगुले यांनी म्हटले आहे.

कोपरगाव शहरातील नागरिक मागील काही वर्षापासून तीव्र पाणी टंचाईची झळ सोसत होते. महिला भगिनींना याचा मोठा त्रास सहन करावा लागत होता. कधी दहा ते पंधरा दिवस व उन्हाळ्यात तर २१ दिवसांनी कोपरगाव शहराला पाणीपुरवठा होत होता. कोपरगावच्या नागरिकांची पाण्यासाठी होणारी ससेहोलपट कायमची थांबविण्यासाठी २०१९ पूर्वी आ. आशुतोष काळे यांनी वेळोवेळी जिल्हाधिकाऱ्यांना भेटून ५ नं. साठवण तलावाच्या कामाचा पाठपुरावा करून सातत्याने ५ नंबर साठवण तलावाच्या प्रश्नाबाबत आवाज उठवला होता.२०१९ ला ज्यावेळी आ. आशुतोष काळे यांना कोपरगावच्या जनतेने सेवा करण्याची संधी दिली त्यावेळी पहिल्या तीन महिन्यांच्या आतच आपल्या कारकिर्दीतील पहिल्या विकास कामांचा श्री गणेशा त्यांनी ५ नं. साठवण तलावाचे प्राथमिक स्वरूपातील खोदाई कामास प्रारंभ करून केला. या ५ नं. साठवण तलावाचे आजपर्यंत जवळपास ९० टक्के काम पूर्ण झाले असल्याचे सुनील गंगुले यांनी सांगितले आहे.

साठवण तलावाला विरोधकांनी प्रत्यक्ष–अप्रत्यक्षपणे विरोध करण्याचा अयशस्वी प्रयत्न देखील केला असला तरी हे सर्व प्रयत्न आ. काळे यांच्या निर्धारापुढे टिकाव धरू शकले नाही. आ. काळे यांनी ५ नंबर साठवण तलाव व वितरण व्यवस्थेसाठी १३१.२४ कोटी निधी दिल्यामुळे या निधीतून भव्य दिव्य साठवण तलाव उभारला आहे. पाण्याचे जलकुंभ देखील उभे राहिले असून वितरण व्यवस्थेचे काम देखील पूर्णत्वाच्या मार्गावर आहे. साठवण तलावाच्या चोहोबाजूंनी भक्कम आर.सी.सी.भिंत असल्यामुळे पाणी चोरी देखील होणार नाही. साठवण तलावाचे काम सुरू झाल्यापासून कोपरगाव शहरातील बहुतांश नागरिकांनी विशेषत: महिला भगिनींनी स्वत: जाऊन ५ नंबर साठवण तलावाचे सुरु असलेले काम पाहिले आहे. त्यामुळे संपूर्ण कोपरगावकर ज्या दिवसाची आतुरतेने वाट पाहत आहेत तो दिवस आ. काळे यांच्या अथक प्रयत्नातून लवकरच उगवणार असून कोपरगावकरांची तहान भागविणारा ५ नंबर साठवण तलाव कोपरगावच्या विकासात मैलाचा दगड ठरणार असल्याचे सुनील गंगुले यांनी म्हटले आहे.